**रे.दि.मू.नं. १०३/२००५ मधील नि. १३४ खालील आदेश**
**( पंडित चव्हाण विरूध्द बाळकृष्ण जगताप )**
**(आदेश पारीत दि. ०४/०२/२०१९)**

सदरचा अर्ज वादी यांनी यातील प्रतिवादी नं. १ हे दि. ०४/११/२०१८ रोजी मयत असून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेकरिता व त्यांचे नावास कंस करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

अर्ज व दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी नं. १ हे दि. ०४/११/२०१८ रोजी मयत आहेत. वादी मागणी करत असलेल्या दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद संपुष्टात आणणेकरिता प्रतिवादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेचा आदेश पारीत करणे व त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी देणे गरजेचे वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. नि. १३४ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी नं. १ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घ्यावेत.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. ०४/०२/२०१९**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**